# ठाण्यात १३ ऑक्टोबरपासून छायाचित्र प्रदर्शन

ठाणे, दि. २० (प्रतिनिधी) - ठाणे महापालिका आणि फोटो सर्कल सोसायटी यांच्या विद्यमाने महापौर छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून गडकरी रंगायतन येथे १३ ते १५ ऑक्टोबर दरम्यान हे प्रदर्शन व स्पर्धा होणार आहे.

ही स्पर्धा हौशी व व्यावसायिक या दोन गटात होणार आहे. हौशी गटासाठी बाजारहाट आणि संध्याकाळ तर व्यावसायिक गटासाठी शिक्षण, प्रतिबिंब, वाहतूक आणि खाद्यपदार्थ हे विषय निश्‍चित करण्यात आले आहेत.

ही स्पर्धा केवळ ठाणे जिल्ह्यातील छायाचित्रकारांसाठी मर्यादित आहे. प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख ७ ऑक्टोबर २००६ ही असून अधिक माहितीसाठी मनोज मुसळे ९८२०१९०६३६ किंवा चेतन सावंत ९८६७४३१३५३ या दूरध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सामना - २१-०९-०६

## छायाचित्र स्पर्धेचे आयोजन

ठाणे : ठाणे महानगरपालिका आणि फोटो सर्कल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महापौर छायाचित्र पुरस्कारांसाठी छायाचित्र स्पर्धेचे आयोजन १३ ते १५ ऑक्टोबरदरम्यान गडकरी रंगायतन येथे करण्यात आले आहे. ही छायाचित्र स्पर्धा हौशी आणि व्यावसायिक या दोन गटात होणार आहे. हौशी गटासाठी बाजारहाट, संध्याकाळ आणि व्यावसायिक गटासाठी शिक्षण, प्रतिबिंब, वाहतूक, खाद्यपदार्थ हे विषय आहेत. ही स्पर्धा फक्त ठाणे जिल्ह्यातील निवासी छायाचित्रकारांसाठी आहे. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख ७ ऑक्टोबर आहे. प्रवेशिका आणि अधिक माहितीसाठी ९८२०१९०६३६ अथवा ९८२११३६७१२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

लोकसत्ता
22-09-06

## छायाचित्र स्पर्धा

ठाणे : ठाणे महापालिका - ठाणे आणि फोटो सर्कल सोसायटीतर्फे ठाणे महापौर छायाचित्र पुरस्कारांच्या छायाचित्र स्पर्धेचे प्रदर्शन १३ ते १५ ऑक्टोबर रोजी गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा हौशी आणि व्यावसायिक अशा दोन गटांत होणार आहे. हौशी गटासाठी बाजारहाट, संध्याकाळ; तर व्यावसायिक गटासाठी शिक्षण, प्रतिबिंब, वाहतूक, खाद्यपदार्थ हे विषय ठेवण्यात आले आहेत. ही स्पर्धा फक्त ठाणे जिल्ह्यातील निवासी छायाचित्रकारांसाठी आहे. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख ७ ऑक्टोबर आहे. अधिक माहितीसाठी मनोज मुसळे- ९८२०१९०६३६, संजोग हाटे- ९८२११३६७१२ यांच्याशी संपर्क साधावा.

सकाळ 22-09-06